# समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका
## जाहिर प्रकटन
## सन २०२०–२०२१

पुणे महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या इ. १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यासाठी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेअंतर्गत आणि इ. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेअंतर्गत पुढील शिक्षणासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना कार्यान्वित आहे. **एका शैक्षणिक वर्षासाठी जास्त अर्ज आल्यास पुणे महानगरपालिकेने अर्थसंकल्पातील वरील योजनेसाठी तरतूद केलेल्या रक्कमेतून समान रक्कम किंवा इ. १० वी करिता रक्कम रू. १५०००/– व इ. १२ वी करिता रक्कम रू. २५०००/– अर्थसहाय्य देणेची योजना आहे.**

सदरचे अर्थसहाय्य उपलब्ध रक्कम व प्राप्त अर्ज यांचा विचार करून देणेत येणार आहे. इ.१० वी व इ. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सुधारित शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेअंतर्गत खालील नियम व अटींत बसणाऱ्या मुलांच्या पालकांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज ऑनलाईन पद्धतीने पुणे महानगरपालिकेच्या **dbt.punecorporation.org** या अधिकृत संकेतस्थळावरती भरणे आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | तपशील |
|---|---|---|
| १. | भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक योजना | १. सन २०२० (फेब्रुवारी–मार्च) या शैक्षणिक वर्षात इ.१० वी /इ.१२ वी मध्ये कमीत कमी ८०% गुण मिळणे आवश्यक आहे. तथापि पुणे महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी/रात्रशाळेतील विद्यार्थी/मागासवर्गीय विद्यार्थी यांनी किमान ७०% आणि ४०% अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांना किमान ६५% गुण मिळणे आवश्यक आहे.<br>२. शैक्षणिक अर्थसहाय्य हे इ.१०/१२ वी नंतर शासनमान्य/विद्यापीठ मान्य संस्थेत प्रवेश घेतला असल्यासच मिळेल. |
| २. | लोकशाहिर अण्णाभाऊ साठे शैक्षणिक योजना | |

**अटी व नियम** :–

- अर्जामधील सर्व अटी व नियम लाभार्थ्यांवर बंधनकारक राहतील. आलेल्या अर्जांचा तसेच उपलब्ध आर्थिक तरतुदीचा व नियम/अटींचा विचार करुन अर्ज नाकारण्याचा वा स्विकारण्याचा अधिकार मा. उप आयुक्त, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका यांना राहील.
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी स्वतःचा जातीचा दाखला अपलोड करणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज रद्द केला जाईल.
- उपरोक्त योजनेचे अर्ज **दि.११ डिसेंबर २०२० ते दि.२९ जानेवारी २०२१ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने dbt.punecorporation.org** या संकेतस्थळावरती भरणेत यावेत.
- **अर्जदाराने आधार कार्ड राष्ट्रीयकृत बँक खाते समवेत लींक (संलग्न) असलेची माहिती अर्जात भरणे आहे.**
- सदरचे शैक्षणिक अर्थसहाय्य हे डीबीटी नुसार अर्जदाराच्या थेट बँकेतील खात्यामध्ये जमा करण्यात येणार असल्याने बँकेची/खात्याची माहिती आयएफएससी कोड सह अचूक देणेत यावी. याबाबत अर्ज भरताना अर्जदाराच्या तांत्रिक चुका झाल्यास समाज विकास विभागाकडे जाहिरात मुदतीत संपर्क साधावा. अन्यथा नंतरच्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही.
- अधिक माहितीसाठी संपर्क क्र. १८००१०३०२२२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच पुणे महानगरपालिकेच्या dbt.punecorporation.org या संकेतस्थळावरती सदर योजनांची माहिती उपलब्ध करून देणेत आलेली आहे.
- वरील योजनांकरीता आवश्यक तेथे शिफारस, अर्जदाराची स्वाक्षरी या पानांची संगणक प्रणालीतून प्रिंट काढून संबंधितांची शिफारस, सही, शिक्का घेवून सदर कागदपत्रे संगणक प्रणालीमध्ये अपलोड करणे संबंधित अर्जदाराची जबाबदारी राहील.

**विक्रम कुमार**
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

**मुरलीधर मोहोळ**
महापौर
पुणे